॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव, (प्रतिनिधी) दि. ११ सप्टेंबर : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या, कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांच्या अध्यक्षतेखाली दि. ९ सप्टेंबर रोजी झालेल्या बैठकीत अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धा, खेलो इंडिया तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर सुवर्ण, रौप्य आणि कास्य पदक प्राप्त करणाऱ्या विद्यापीठाच्या गुणवंत खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी दरमहा पाच हजार रुपयांची आर्थिक मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला.

या बैठकीत प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे, व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे, नितीन झाल्टे, प्रभारी अधिष्ठाता जगदीश पाटील, प्राचार्य एस.एस. राजपूत, प्राचार्य महेंद्र रघुवंशी, प्राचार्य शिवाजी पाटील, डॉ. पवित्रा पाटील, डॉ. सुरेखा पालवे, डॉ. संदीप पाटील, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, वित्त व लेखा अधिकारी सीए रवींद्र पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक प्रा. योगेश पाटील उपस्थित होते.

या संदर्भात दि. १३ ऑगस्ट २०२६ रोजी झालेल्या क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील प्रथम सभेत खेळाडूंच्या आहाराची आवश्यकता, सरावासाठी लागणारी ऊर्जा तसेच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील स्पर्धांसाठी त्यांची तयारी लक्षात घेऊन पदकविजेत्या खेळाडूंना दरमहा पाच हजार रुपये शिफारस करण्यात आली होती. या अनुषंगाने व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला.

या निर्णयामुळे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांमधील गुणवंत खेळाडूंना सहाय्य मिळणार असून, आर्थिक अडचणींमुळे आहार व सरावावर परिणाम होऊ नये, यासाठी ही योजना उपयुक्त ठरणार आहे. खेळाडूंना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देत त्यांच्या कामगिरीला प्रोत्साहन देण्याच्या विद्यापीठाच्या प्रयत्नांना या निर्णयामुळे बळ मिळाले आहे. तसेच विद्यापीठातील खेळाडूंमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, भविष्यात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिकाधिक पदके मिळविण्यासाठी खेळाडूंना प्रेरणा मिळणार आहे.

**बातमी क्र. २**

जळगाव, (प्रतिनिधी) दि. ११ सप्टेंबर : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव आणि भारत सरकारच्या इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाच्या अंतर्गत कार्यरत नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ इलेक्ट्रॉनिक्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी यांच्यात क्रेडिट-आधारित, कौशल्याभिमुख आणि तंत्रज्ञान-सक्षम शिक्षणाच्या विस्तारासाठी महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आला.

नवी दिल्ली येथील इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाच्या सचिव कार्यालयात नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ इलेक्ट्रॉनिक्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी डिजिटल युनिव्हर्सिटी प्लॅटफॉर्म आणि सेलर युनिव्हर्सिटी, यूएसए यांच्यातील सहकार्य व एकात्मीकरणाच्या शुभारंभ कार्यक्रमादरम्यान हा करार करण्यात आला. कार्यक्रमास इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाचे सचिव श्री. एस. कृष्णन प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. विविध भागीदार संस्थांसोबत करण्यात आलेल्या सामंजस्य करारांमध्ये कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा समावेश होता.

या सामंजस्य कराराद्वारे नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ इलेक्ट्रॉनिक्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी डिजिटल युनिव्हर्सिटी प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून क्रेडिट-आधारित, कौशल्याधारित तसेच नॅशनल स्किल्स क्वालिफिकेशन्स फ्रेमवर्क शी संलग्न अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. यामध्ये ऑनलाइन व ब्लेंडेड लर्निंग, लर्निंग मॅनेजमेंट सिस्टिम, व्हर्च्युअल लॅबोरेटरीज, एआय-सक्षम शिक्षण, मूल्यांकन आणि प्रमाणपत्राधारित शिक्षण यांचा समावेश करण्यात आला आहे.

आर्टिफिशियल इंटेलिजन्स, डेटा सायन्स, सायबर सिक्युरिटी, इंटरनेट ऑफ थिंग्ज , क्लाऊड कम्प्युटिंग, ब्लॉकचेन, एआर/व्हीआर आणि सेमीकंडक्टर टेक्नॉलॉजीज यांसारख्या आधुनिक क्षेत्रांमध्ये विद्यार्थ्यांना कौशल्याधारित शिक्षणाच्या संधी उपलब्ध होणार आहेत. तसेच विद्यापीठाच्या एआय लिटरेसी मिशन अंतर्गत ‘युवा एआय फॉर ऑल’ कार्यक्रम राबविण्यासही सहकार्य मिळणार आहे. सामंजस्य कराराच्या स्वाक्षरी व देवाणघेवाण कार्यक्रमास कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या वतीने आजीवन अध्ययन शिक्षण विभागाचे संचालक प्रा. मनिष जोशी, डॉ. राजेश जावळेकर उपस्थित होते.

या सहकार्यामुळे विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना उद्योगाभिमुख शिक्षण, डिजिटल कौशल्ये, प्रमाणपत्राधारित अभ्यासक्रम आणि भविष्यातील रोजगारासाठी आवश्यक आधुनिक कौशल्ये विकसित करण्याच्या व्यापक संधी उपलब्ध होणार आहेत.

---

कबचौउमवि / १६/ जनसंपर्कविभाग / २०२६ दि. ११ सप्टेंबर, २०२६

प्रती,
मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया,उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी,ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता